MHTH160007942022

**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ४८/२०२२</u>**
**<u>हिना हेमंत शाह वि. निरंक</u>**
**<u>निशाणी क्र.०१ वर आदेश</u>**

---

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार **हिना हेमंत शाह उर्फ हिना ठाकोरभाई पटेल** हिने मयत कपिल ठाकोरभाई पटेल (**यानंतर ''मयत कपिल'' असा उल्लेख**) याचे ती कायदेशिर वारस असल्याबाबतचे मुंबई रेग्युलेशन, १८२७ च्या कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे कथन आहे की, मौजे बोईसर, ता.जि. पालघर येथील–

**अ.** सर्वे नं. १४४ हिस्सा नं. अ पैकी, प्लॉट नं. ६३ या बिन शेती जमीनीवर असलेल्या सुरज अपार्टमेंट मधील गाळा क्र. पी–६, तळ मजला विंग अे–२ क्षेत्र ४५ चौ.फूट म्हणजे ४–१८ चौमी ग्रामपंचायत घर क्र. ४२७५/३३,

**ब.** सर्वे नं. ११४ हिस्सा नं. अ पैकी प्लॉट नं. ६३ या बिन शेती जमीनीवर असलेल्या कुसूम अपार्टमेंट मधील गाळा क्र. ८, तळ मजला एकूण क्षेत्र २४० चौ.फूट म्हणजे २२–३० चौ.मी. ग्रामपंचायत घर क्र. ५५०९/२८,

**क.** सर्वे नं. ११४ हिस्सा नं. अ पैकी प्लॉट नं. ६३ या बिन शेती जमीनीवर असलेल्या श्री विशाल अपार्टमेंट मधील सदनिका क्र. ३, विंग बी, बिल्डींग नं. अे/४, क्षेत्र ५९५ चौ.फूट म्हणजे ५५–२९ चौ.मी. ग्रामपंचायत घर क्र. ४८२४ (३),

या मिळकती मयत कपिलच्या नावावर आहे व त्याच्या आहेत (यानंतर **<u>सदरहू मिळकती</u>** असे संबोधीण्यात येईल). मयत कपिल हा अर्जदार हिना हेमंत शहा हिचा भाउ होता. अर्जदारास शासकीय अथवा निमशासकीय कामाकरीता ते मयत कपीलच्या वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

३. अर्जदाराच्या कथना प्रमाणे मयत कपिल हा दिनांक २८/०४/२०२१ रोजी अवधनगर, सरावली पालघर येथे मरण पावला. मयत कपिल यांनी मृत्युपुर्वी कोणतेही मृत्यूपत्र अथवा व्यवस्था अधिकारपत्र करुन ठेवले नाही. अर्जदाराशिवाय

मयताचे इतर कोणीही वारस नाहीत. येणे प्रमाणे कारणावरुन अर्ज मंजूर करण्याची त्यांनी विनंती केली.

४. अर्जदारा व्यतिरिक्त मयत कपिल याचे दुसरे कोणीही वारसदार आहेत किंवा नाही हे जाणून घेण्यासाठी या प्रकरणात अर्जदाराच्या वतीने दिनांक १०.११.२०२२ रोजी ''दैनिक सागर'' या वृत्तपत्रात जाहीरनामा प्रकाशीत करण्यात आला. सदर वृत्तपत्रातील जाहीरनाम्याची प्रत पटलावर (नि.क्र.२७) अन्वये दाखल केली आहे. तसेच, सदरील जाहीरनाम्याची एक प्रत बेलीफचा अहवाल (नि.क्र.०६) प्रमाणे ग्रामपंचायत, नगरपरिषद कार्यालय, तहसील कार्यालय पालघर यांच्या नोटीस बोर्डवर, मयताच्या घरावर आणि मा.सह दिवाणी न्यायालय क.स्तर, पालघर यांच्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर लावून जाहीरनामा जाहीर केल्याचे दिसून येते.

५. आपल्या कथनाचे पुष्टयर्थ अर्जदाराने स्वतःला पुराव्याचे शपथपत्र (नि.क्र.०९) वर तपासले व साक्षीदार क्र. २ प्रीती किशोर दलाल हिला नि.क्र.२९ वर तपासले. तर आपल्या तोंडी पुराव्याच्या पुष्टयर्थ पटलावर कागदोपत्री पुरावा म्हणुन मयत कपिल ठाकोरभाई पटेल याचे मृत्यूचे प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत नि.क्र.१२, मयत कपिलच्या आधारकार्डची साक्षांकीत प्रत नि.क्र.१३, मयत कपिलच्या निवडणूक ओळखपत्राची साक्षांकीत प्रत नि.क्र.१४, मयत कपीलच्या नावे असलेला गाळा क्र. पी–६ ची विक्री कराराची छायांकीत प्रत नि.क्र.१५, मयत कपीलच्या नावे असलेला गाळा क्र. पी–६ ची घरपट्टी प्रत नि.क्र.१६, मयत कपीलच्या नावे असलेला गाळा क्र.६ च्या सूरज को.ऑ.हा.सो.लि. या सोसायटीकडील शेअर सर्टीफिकेटची छायांकीत प्रत नि.क्र.१७, मयत कपीलच्या नावे असलेला गाळा क्र.८ च्या विक्री काराराची छायांकीत प्रत नि.क्र.१८, मयत कपीलच्या नावे असलेला गाळा क्र.८ च्या कुसूम को.ऑ.हा.सो.लि. या सोसायटीकडील शेअर सर्टीफिकेटची छायांकीत प्रत नि.क्र.१९, मयत कपीलच्या नावे असलेला सदनिका क्र. ३ च्या कराराची छायांकीत प्रत नि.क्र. २०, मयत कपीलच्या नावे असलेली सदनिका क्र. ३ च्या घरपट्टी प्रत नि.क्र.२१, मयत कपीलच्या नावे असलेली सदनिका क्र. ३ श्री विशाल अपार्टमेंट को.ऑ.हा.सो.लि.या सोसायटीकडील शेअर सर्टीफिकेटची छायांकीत प्रत नि.क्र. २२, मयत व अर्जदाराचे वडील ठाकोरभाई पटेल व आई देवीबेन यांचे मृत्यूप्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत नि.क्र. २३ व २४, अर्जदाराचे आधारकार्डची साक्षांकीत प्रत नि.क्र.२५ व अर्जदाराचे पॅनकार्डची साक्षांकीत प्रत

नि.क्र.२६ वर दाखल केलेले आहे. या कागदपत्रांचे बारकाईने अवलोकन केले असता असे दिसून येते की, कपिल ठाकोरभाई पटेल याचा मृत्यु दिनांक २८/०४/२०२१ रोजी झालेला आहे. पटलावरील पुराव्यावरुन व अर्ज (नि.क्र.०१) मधील कथनावरुन असे लक्षात येते की, अर्जामध्ये नमूद केलेला मयत कपिल हा पुरुष मयत नसल्याबद्दल पटलावर कोणताही आक्षेप कोणाकडूनही आला नाही.

६. पटलावरील पुराव्याचे अवलोकन केले. पटलावरुन असे दिसुन येते की, अर्जदार क्र.०१ ही मयत कपिलची बहिण आहे. तो अविवाहित मरण पावला आहे. अर्जदार ही मयत कपिलची वर्ग–१ मध्ये मोडणारी जवळची हयात वारस आहे. त्यामुळे अर्जदार हिच्या नावे मयताचे वारस प्रमाणपत्र देणे न्यायाच्या दृष्टीने योग्य आहे.

७. अशाप्रकारे अर्जातील अर्जदारा व्यतिरीक्त मयत कपिलचे इतर कोणतेही वारसदार हयात नाहीत, असे गृहीत धरुन मुंबई रेग्युलेशन १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र निर्गमीत करण्याबाबत आदेश पारीत करणे आवश्यक आहे. कारण, या न्यायालयामध्ये आजतागायत मयत कपिलचे अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार असल्याबद्दल आक्षेप प्राप्त झाला नाही. त्यामुळे अर्जदाराचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. करीता, मी येणे प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.:–

## आदेश

०१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२. अर्जदार हिना हेमंत शाह उर्फ हिना ठाकोरभाई पटेल ही मयत कपिलची बहिण आहे व कायदेशीर वारस असल्यामुळे मुंबई रेग्युलेशन १८२७ चे कलम २ अन्वये परिशिष्ट (ब) मधील नमुन्यात वारस प्रमाणपत्र निर्गमीत करण्यात यावे व त्याखाली नियमाप्रमाणे नोंद करावी किंवा नोट टाकावी.

०३. योग्य ते न्यायालयीन शुल्क अदा केल्यानंतर वारस प्रमाणपत्र देण्यात यावा.

SATISH YADAVRAO KADAM
Digitally signed by SATISH YADAVRAO KADAM

**(सतिश या. कदम)**

दिनांक :– ०२/०९/२०२३

सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
पालघर.